# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.02.2026** **वार- रविवार**

---

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. दिल्लीत नुकतीच पार पडलेली एआय समिट, अवयवदानाचं महत्व,भारतीय क्रीडापटूनचं उल्लेखनीय यश,तसंच व्होकल फॉर लोकल यासारख्या विविध विषयांवर पंतप्रधानांनी मन कि बात मध्ये भाष्य केलं. पुण्यात महापौर मंजूषा नागपुरे, केंद्रीय राज्यमंत्री ,मुरलीधर मोहळ आमदार सिद्धार्थ शिरोळे, उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी मन की बात या कार्यक्रमाचं नागरीकांसह सामूहिक श्रवण केलं. पंतप्रधानांनी मांडलेल्या विविध सामाजिक विचारांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली,देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकांनं सक्रिय सहभाग घ्यावा असा संदेश या भाषणातून मिळाला असं महापौर नागपुरे यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**विधीमंडळ**

राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या ६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील. दरम्यान अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी आज बहिष्कार टाकला आहे. प्रचंड बहुमतामुळे सत्ताधारी पक्षाचं वर्तन सभ्यपणाचं नाही, जिथं लोकशाहीचा मान राखला जात नाही तिथं आपण चहापानाला जाणार नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितलं. विरोधी पक्षांनी आज मुंबईत आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत - अमेरिका करार हा पूर्णपणे शेतकरी विरोधी असल्याची टीका जाधव यांनी केली. दिवंगत उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबतही अनेक शंका आहेत, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यावेळी उपस्थित होते.

**छात्रसंसद**

प्रत्येक राज्यातील कामगिरी पारदर्शकपणे जनतेसमोर यावी यासाठी विधिमंडळाचा एक 'राष्ट्रीय विधिमंडळ निर्देशांक' असायला हवा,असं मत दिल्ली विधानसभेचे सभापती विजेंदर गुप्ता यांनी व्यक्त केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्यावतीनं पुण्यात आयोजित १५ व्या 'भारतीय छात्र संसदेच्या' उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते आज बोलत होते. विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार दिग्विजय सिंह, ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक राजदीप सरदेसाई, जर्मनीच्या हॅम्बुर्ग इथल्या हवामान बदल व्यवस्थापन विभागाचे प्रा. वॉल्टर लील फिल्हो आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**राष्ट्रीयकृषी विकास योजना**

केंद्र सरकारनं प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत महाराष्ट्राला 2026- 27 या वर्षासाठी 12शे 56 कोटी रुपयांचं अनुदान मंजूर केलं आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे मुख्य सचिव डॉ. देवेश चतुर्वेदी यांनी महाराष्ट्र राज्यासाठी पीएम-आरकेव्हीवाय अंतर्गत वार्षिक कृती आराखड्यानुसार ही रक्कम मंजूर केल्याचं पत्र राज्याच्या मुख्य सचिवांना पाठवलं आहे.

**शरदपवार**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष  ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अशक्तपणा जाणवत असल्यानं त्यांना पुण्यातील एका  खासगी  रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात आलं आहे. पुढील वैद्यकीय तपासणीनंतरच त्यांच्या प्रकृतीबाबतची अधिकृत माहिती जाहीर केली जाणार आहे.

**मिसिंगलिंक**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकचे काम पूर्णत्वास येत असून, येत्या एक मे पासून वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे. यामुळे घाटमाथ्यावरील वाहतूक कोंडी टळेल. शिवाय प्रवासाचा वेळ २० ते २५ मिनिटांनी कमी होईल.

**जलस्वच्छता मोहीम**

संत निरंकारी मिशनच्या वतीनं ‘प्रोजेक्ट अमृत’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचं आयोजन आज पुण्यात करण्यात आलं होतं.या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली.

**डेंगी रुग्णसंख्या**

पुणे महानगरपालिका  हद्दीत डेंगीची रुग्णसंख्या घटत असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली आहे. 2024 च्या तुलनेत 2025 मध्ये पुणे शहरातील डेंगी रुग्णसंख्या सुमारे एकतृतीयांश झाली आहे,असं सहायक आरोग्य अधिकारी डॉ.राजेश दिघे  यांनी सांगितलं.

**पिंपरी चिंचवड मनपा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीनं अनधिकृत बांधकामं आणि मिळकतींवर करण्यात येणाऱ्या कारवाईच्या अनुषंगानं महापालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एका विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलं  होतं.अनधिकृत बांधकामांना नोटीस देण्याची कार्यपद्धती, पंचनामा तयार करण्याची प्रक्रिया आणि कायदेशीर तरतुदींचा योग्य आणि परिणामकारक वापर कसा करावा, याबाबत या कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन करण्यात  आलं.

**कृषीबाजार**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह  अन्य राज्यातून सुमारे 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली.

आवक वाढल्यानं गवार, दुधीभोपळा सह काही फळ भाज्यांच्या भावात घसरण झाली.फळ बाजारात रसाळ फळांना चांगला उठाव मिळत असून बोरे आणि लिंबांच्या भावात घट झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 34 तर किमान 19 अंश सेलसियस तापमानची नोंद करण्यात आली. उद्या आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,  संध्याकाळी सहा वाजता , ताज्या पुणे वृत्तांतमध्ये.**

**नमस्कार.**